# राशिभविष्य-ऑक्टोबर, २०१६.

दादा दामले(dadadamle@gmail.com)

=============================================================

**(१) मेष -** हर्शल , नेपच्यून, शनि आणि काही प्रमाणात रवि हे ग्रह या महिन्याच्या काळात प्रतिकुल असल्यामुळे या राशीच्या मंडळीनीया महिन्याच्या काळात सतत मनावर संयम ठेवून, सहनशील बनून, तापट स्वभावावर ताबा ठेवून आणि शक्यतो मौन व्रत धारण करूनच प्रतिकुल काळाशी मुकाबला केला तरच ते सुखाचे होईल. सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे संभवते. तसेच आर्थिक समस्याही त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. कुमार्गी मित्रांपासून दूर राहा. येणारे हक्काचे धन मिळण्यात विलंब होणे संभवते. अशा सर्व त्रासांमुळे गहरे नैराश्य येईल. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या शत्रुराशीतील शनि ग्र हामुळे असमाधानकारक घटना घडणे, अपेक्षाभंग होणे, अनारोग्य होणे संभवते. त्यामुळे मन अस्वस्थराहील . जपा. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या राहूमुळे विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे शक्य आहे. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. परंतु ज्यांचा दलाली, कमिशन वर व्यवसाय आहे अशांना मात्र हा राहू अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल असणार आहे. त्यामुळे त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. महिन्याचा उत्तरार्ध प्रतिकुल असून आरोग्यविघातक व वैवाहिक जीवनात बाधा निर्माण करणारा असाच सिद्ध होण्याची शक्यता दिसते. जपा. बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांनासंपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल होईल. महिन्याच्या उत्तरार्धात गुरू-शुक्र ग्रहांच्या अनुकुलतेने मनोनुकुल घटना घडतील. श्रद्धेने श्रीगणेश उपासना करा.

**(२) वृषभ -** या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ यशदायक व लाभदायक होईल. मात्र त्यांना स्वत:चे सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखता आले पाहिजे. तसेच सहकाऱ्याशी, मित्रांशी अकारण वाद, भांडणे होणार नाहीत याची काळजी घेतली पाहिजे. शैक्षणिक क्षेत्र कोणतेही असो, या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. मात्र त्यासाठी मन व बुद्धी स्थिर राखता आली पाहिजे. कारण राहूमुळे

कौटुंबिक सुख व गृहसौख्य यांत बाधा निर्माण होणे संभवते. त्यामुळे अभ्यासासाठी मन व बुद्धीची एकाग्रता लाभण्यात बाधा येणे संभवते. जपा. अपघातभय असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. प्रिय जनांपासून दुरावा निर्माण झाल्यास मन अधिकच अस्वस्थ होईल. जपा. या राशीच्या युवकांनी सध्या आहे ती नोकरी वा व्यवसायच मनावर ताबा ठेवून व सहनशील बनून नेटाने करावा. हातचे सोडून पळत्याच्या मागे लागू नये. कारण अशा बदलास काळ अनुकुल नाही. तसेच कुसंगतीपासून दूर राहावे. केवळ मानसिक रोग तज्न्य व द्रव पदार्थांचे व्यापारी यांनाच काळ अनुकुल होईल. जीवनसाथीचे अनारोग्य, दोघांतीलवाद, भांडणे अशापैकी कारणानी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थितीत खूपच बदल होईल. मनोनुकुल व लाभदायक घटना घडतील, मानसिक ताण नाहीसा होईल व खूप बरे वाटेल. कुलदैवताची उपासना करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या काळात प्रिय जनांशी वाद, भांडणे होणार नाहीत याची काळजी घ्यावी व स्वत:चे आरोग्य उत्तम राहील याची काळजी घ्यावी. तरच कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभू शकेल. तसेच नोकरी-व्यवसायातही मनापासून काम करणे जमेल. सामान्य नोकरी असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. पण चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय, शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र , यांत्रिक तांत्रिकव कलात्मक नोकरी-व्यवसाय, असणारांना तसेच लोखंड, कोळसा यांचा व्यापार असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतीकारक व लाभदायक होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना महिन्याचा पूर्वार्धच मनापासून अध्ययन करण्यास अनुकुल होईल. महिन्याच्या उत्तरार्धात अनारोग्यामुळे वा अन्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता असल्यामुळे अध्ययनात बाधा येणे संभवते. जपा. मनेप्सित साधण्यासाठी या राशीच्या काही जणांकडून “ वरून कीर्तन , आतून तमाशा “ अशा प्रकारचे ढोंगी आचरण होणे संभवते. पण त्यात धोका आहे, त्यामुळे मनावार ताबा ठेवा. ज्यांना अध्यात्माची मनापासून आवड व ओढ आहे अशांना आध्यात्मिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. वैवाहिक सुखी जीवनात बाधा येऊ नये म्हणून थोडे नमते घेऊन समजूतदारपणे आचरण करा. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनीही गैरसमजाने वा संशयाने भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. श्रद्धेने श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्र “चे पठण करा.

**(४) कर्क** - या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात आर्थिक व कौटुंबिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. अनपेक्षित खर्च निर्माण झाल्यास अपेक्षित अर्थप्राप्तीसाठी काही मंडळीना कठोर परिश्रम करावे लागतील. तसेच नियोजित कार्य पार पाडण्यात दिरंगाई होणेही संभवते. त्यामुळे मनस्ताप सहन करावा लागणे संभवते. त्यात भर म्हणून कौटुंबिक समस्या, गृहकलह अशापैकी घटना घडल्या तर गहरे नैराश्य येणेही शक्य आहे. जपा. विशेष करून महिन्याचा उत्तरार्ध प्रतिकुल असण्याची शक्यता गृहीत धरून मन व बुद्धीवर ताबा ठेवा व सहनशील बनून नम्रतेचे आचरण करा. जलप्रवास करू नका. तसेच विषभय असल्याने खाद्यपदार्थ नीट तपासूनच खा. काहीना त्वचेचे आजार, काहीना रक्तविकार तर काहीना मुखदंत विकाराचा त्रास होणे संभवते. शनि-केतू अशुभ योगामुळे वैवाहिक जीवनातील सुखात व संततिसुखात बाधा येणे संभवते. कुसंगतीपासून जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने अनुकुल व विविध प्रकारे लाभदायक होईल व सुखसमाधान लाभेल. शास्त्रीय संशोधन कार्य क्षेत्र , वैद्यकीय व्यवसाय, यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय, शेती व्यवसाय, औषधविक्रेते तसेच साहित्यिकांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक , यशदायक व लाभदायक होईल. प्रवासाचेतर काहीना परदेशगमनाचे योग येतील. गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्र वाचा.

**(५) सिंह** - या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या पूर्वार्धात आर्थिक जबाबदाऱ्या पार पडण्याची चिंता त्रस्त करील. कारण वाढता खर्च , फसवणूक, पैसे गहाळ होणे अशापैकी घटना घडणे संभवते. जपा. काही मंडळीना डोळ्याच्या अनारोग्याचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. काही कारणाने आप्तेष्टांशी वाद, भांडणे झाल्यास अकारण मनस्ताप सहन करावा लागेल. म्हणून आपल्या अधिकारशाही व संतापी स्वभावाला लगाम घालूनच आचरण करा. तसे आचरण झाल्यास बुध-गुरु ग्रहांच्या अनुकुलतेमुळे मिळणाऱ्या कौटुंबिक सुखात बाधा येणार नाही. कुटुंबात शुभ घटना घडतील. व्यवसायात प्रगती होईल. काहींना अर्थलाभ होणेही शक्य आहे. पण महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या नोकरदार मंडळीना मात्र नोकरीत प्रतिकुल परिस्थितीला सामोरे जावे लागण्याची शक्यता दिसते. महिन्याचा उत्तरार्ध मात्र सर्व

प्रकारच्या नोकरदार मंडळीना सुखसमाधान देणारा व विविध प्रकारचे लाभ देणारा असाच सिद्ध होईल. राहू-शनि-हर्शल -मंगळ हे ग्रह प्रतिकुल असल्याने गृहसौख्यात, संततिसुखात व वैवाहिक जीवनातील सुखात बाधा किंवा कमतरता निर्माण होण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या विद्यार्थ्यांना अनारोग्यामुळे किंवा अभ्यासाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे शैक्षणिक प्रगती करणे शक्य होणार नाही. जपा. वैद्यकीय व्यवसाय, बौद्धिक व्यवसाय, शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणाराना महिन्याचा उत्तरार्ध खूपच लाभदायक होईल. अपघात भय असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल

**(६) कन्या -** सध्या या राशीच्या मंडळीना उगीचच कसली तरी आजार भावना त्रस्त करीत असण्याची शक्यता दिसते. तसेच काल्पनिक चिंताही अस्वस्थकरत असण्याची शक्यता जाणवते. पण अकारण चिंता करू नका. नपेक्षा खरेच अनारोग्याचा त्रास होईल. ज्यांना हृदयविकार, रक्तविकार असे आजार आहेत त्यांनी तर विशेष काळजी घेतली पाहिजे. मन व बुद्धी शांत व स्थिर ठेवा. शनि ग्रहाच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे या राशीच्या काही युवकांना उत्तम नोकरी मिळेल किंवा अपेक्षित असे नवे कार्यक्षेत्र प्राप्त होईल. पण हा शनि भावंडविषयक एखादी चिंता निर्माण करण्याची शक्यता दिसते. जपा. वकिली-सल्लागारी व्यवसाय असणारांना अनुकुल होईल. बौद्धिक नोकरी असणारांना बुध-गुरु हे ग्रह प्रगतिकारक व लाभदायक होतील. लाभदायक होतील. या राशीच्या सप्तम स्थानी असलेला वक्री हर्शल आणि व्ययस्थानी असलेला राहू वैवाहिक जीवनातील सुखात व व्यावसायिक भागीदारेत बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. जपा. पण हाच राहू हितशत्रूपासून रक्षण करील, अर्थलाभ देईल व काही मंडळीना परदेशगमनाची संधीही देऊ शकेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामु ळे गैरसमजाने वा अन्य कारणांनी कुटुंबात वाद, भांडण तंटे, असमाधानकारक घटना असे काही घडू शकेल. जपा. काही मंडळीना राहत्या जागेची तर काहीना स्थावरसंबंधीची समस्या त्रस्त करील. तसेच काही कारणाने अपेक्षित संततिसुख मिळेलच याची खात्री नाही. गुरू-शुक्राच्या काही प्र माणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. शिवाय सध्या या राशीच्या मंडळीचे मन अतिशय चंचल व भावनाशील

झाले असण्याची शक्यता जाणवते. सतत मनस्ताप, मनाविरुद्ध घटना, नियोजित कार्यात अडथळे, आर्थिक समस्या अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल. जपा. प्रतिकुल काळाशी सहनशील बनून मुकाबला करणेच सुखाचे होईल. रक्तदाब, हृदयविकार असे आजार असणारांनी तर विशेष काळजी घेतली पाहिजे. कौटुंबिक सुखात बाधा येऊ नये म्हणून वाद, भांडणे टाळा. अध्यात्मात रस असेल तर प्रिय दैवताच्या उपासनेतच काळ व्यतीत करा. शनि ग्रहाच्या साडेसातीचा केवळ चार महिन्यांचा काळ उरला आहे. नंतर परिस्थिती बदलणार आहेच. सामाजिक कार्याची आवड असेल तर गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने अशा कार्यात सुखसमाधान मिळेल. मंगळ ग्रहाच्या अनुकुलतेमुळे धैर्य, हिम्मत वाढेल. त्याचा लाभ उठवा. या राशीच्या नोकरदार मंडळीना काही प्रमाणात महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होईल. महिन्याच्या उत्तरार्धात मनस्ताप, अनारोग्य होणे संभवते. जपा. यांत्रिक तांत्रिक नोकरी-व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय, औषध विक्रेते, शास्त्रीय संशोधन कार्य असणारांना काळ अनुकुल होईल. विविध कारणानी या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होणेसंभवते. तसेच या राशीच्या मंडळीना संततिविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. अकारण अति विचार करू नका. डोकेदुखी, मेंदूविकार अशापैकी आजार उद्भवू शकतील. जपा. श्रद्धेने शिवोपासना व श्रीहनुमान उपासना करा. हनुमानचालीसा स्तोत्राचे पठण करा.

**(८) वृश्चिक** - नोकरी - व्यवसाय कोणताही असो, या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल असणार आहे. रवि-राहूच्या अनुकुलतेमुळे व्यावसायिक प्रगती होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना बढती, वेतनवाढ, मानाचे स्थान वा उच्च पद असे काही मिळणे संभवते काहींचा सन्मान होणेही संभवते. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना काळ प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. पण शनि-मंगळ पूर्णपणे व रवि ग्रह महिन्याच्या उत्तरार्धा त प्रतिकुल होणार असल्यामुळे कौटुंबिक सुख व गृहसौख्य यात विविध कारणांनी बाधा येऊ शकेल. जपा. लग्नी शत्रुराशीतील शनि असल्यामुळे सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे संभवते. कुटुंबातील प्रिय व्यक्तींचे दूर गावी स्थलांतर झाल्यास अस्वस्थ व्हाल. जपा. स्वत:च्या व जीवनसाथीच्या आरोग्याची काळजी घ्या. धनस्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे आर्थिक कोंडी होणे संभवते. देणे द्यावेच लागेल; पण येणे वसूल होण्यात दिरंगाईहोईल. काहीना अर्थपुरवठा होण्यासाठी अधिक कष्ट-परिश्रम करावे

लागतील. त्यामुळे थकवा येणे, शारीरिक उष्णता भडकणे, डोळे तळावणे अशापैकी परिणाम भोगावे लागण्याची शक्यता दिसते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात शुक्र ग्रह या राशीच्या प्रथम स्थानी आल्यावर गुरु-शुक्र शुभ योगामुळे थोड्या मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धे ने श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, यशदायक व लाभदायक होईल. मोठ्या लोकांच्या ओळखी होईत. काहीना बढती, पगारवाढ, काहीना मानाचे स्थानवा उच्च पद असे काही मिळू शकेल. इच्छा आकांक्षा पूर्ण होतील. बौद्धिक व शैक्षणिक कार्यक्षेत्र असणारांना काळ प्रगतिकारक , यशदायक व लाभदायक होईल. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायातही वाढ होणे संभवते. पण या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या शनीमुळे मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची दाट शक्यता आहे. जपा. अकारण श्रम, दगदग करू नका. यांत्रिक तांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना मात्र काळ फारसा अनुकुल होण्याची शक्यता दिसत नाही. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या हर्षलमुळे कोणाशी पटणार नाही. आहे त्यात सुखसमाधान लाभणार नाही, भाग्यस्थानी असलेल्या राहूमुळे घरात वाद, भांडणे होणे संभवते. तसेच गृहसौख्यातही बाधा येऊ शकेल. जपा. सध्या या राशीच्या मंडळीचे मन अतिशय भावनाशील झाले असण्याची शक्यता वाटते. तसे असेल व या राशीच्या काही मंडळीना अध्यात्मात रस असेल तर आध्यात्मिक उपासनेद्वारा मन:शांती मिळेल व आरोग्यही फारसे बिघडणार नाही. या राशीच्या काही मंडळीना परदेशगमनाची तर काहीना जलप्रवासाचीसंधी मिळणे संभवते. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री - ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा "चे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या काळात सतत सावधानपूर्वक व विचारपूर्वक आचरण करावे, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. कारण या राशीच्या व्ययस्थानी असलेला मंगळ ग्रह पूर्णपणे अशुभ असून त्यामुळे जुनी काही दबलेली प्रकरणे असतील तर ती पुन्हा उकरली जाऊन त्यांचा असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता जाणवते. जपा. गैरसमजुती, वाद, भांडणे अशापैकीकारणानी मन

निराश व अस्वस्थ होणे संभवते. जपा. मानहानी होणे, आर्थिक चिंता त्रस्त करणे संभवते. जपा. उच्च बौद्धिक शक्ती, स्मरणशक्ती, आकलनशक्ती प्राप्त झाली असल्यास गूढ संशोधन, अतिशय गहन व कठिण समस्या सोडवणे सहज शक्य होईल. या राशीच्या नोकरदार मंडळीना यां महिन्याचा पूर्वार ्धा प्रतिकुल असल्यामुळे त्यांनी मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आचरण केले तरच सुखाचे होईल. त्यामुळे महिन्याच्या उत्तरार्धात अनुकुल कालाचा लाभ उठवणे शक्य होईल. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरी-व्यवसायात मनासारखे सर्व काही घडण्याची शक्यता दिसते. पण वाममार्ग धनाचा मोह टाळाच. वकिली-सल्लागारी व्यवसाय, अन्य बौद्धिक, शैक्षणिक व्यवसाय असणाराना अपेक्षित प्रगती करणे व यश मिळवणे शक्य होईल. आर्थिक लाभ होतील. पण या राशीच्या विद्यार्थ्यांना विविध कारणानी अपेक्षित शैक्षणिक प्रगती करणे शक्य होणार नाही. जपा. तसेच या राशीच्या मंडळीच्या संततिसुखातही बाधा येणे संभवते. या राशीच्या काही भाग्यवान मंडळीना परदेशगमनाची संधी मिळेल. श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना मन व बुद्धी स्थिर, शांत राखण्यास उपयुक्त होईल.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळीची मनस्थिती कोमल पण शीघ्र मानसिक संवेदना होत असणारी अशी झाली असण्यची शक्यता जाणवते. तसेच स्वभाव अस्थिर, चंचल असा घडला असावा, असेही जाणवते. शिवाय अविचाराचे आचरण, अविचाराने खर्च होणे, अविचाराने फटकळ बोलणे होत असल्याची शक्यताही जाणवते. त्यामुळे मैत्रीत वितुष्ट येऊ शकेल. जपा. वर सूचित केलेली वस्तुस्थिती असेल तर आग्रहाने सांगावेसे वाटते की, या महिन्याचा काळ या राशीच्या मंडळीना फारसा अनुकुल नसल्यामुळे त्यांनी मनावर संयम ठेवून, सहनशील बनून व विचारपूर्वक सावधानतेने आचरण करणेच सुखाचे होईल. वाहनधोका संभवतो. जपा. अपेक्षित आर्थिक प्राप्तीसाठी काही मंडळीना अधिक कष्ट, परिश्रम करावे लागतील. या राशीच्या नोकरदार मंडळीना नोकरीत त्रास , वरीष्ठांशी मतभेद होणे संभवते. ज्या मंडळीचा स्वतंत्र व्यापार-व्यवसाय असेल त्यांनाही व्यावसायिक पीछेहाट होत असल्याचा अनुभव येईल. केवळ वकिली-सल्लागारी व्यवसाय, अन्य बौद्धिक, शैक्षणिक व्यवसाय असणारांना व लोखंड, कोळसा व्यापारी यांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. राहूमुळे वाद, भांडणे, गैरसमज आदी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचा योग आहे अशापैकी काहीना अचानक धनलाभ वा वारसा हक्काने धनलाभ होऊ शकेल. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून

मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर " शिवोपासना " आणि श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व दिलासा मिळेल.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात स्वत:च्या व कुटुंबियांच्या सर्व प्रकारच्या आरोग्यविषयक समस्यांना तोंड द्यावे लागेलसे दिसते. काही मंडळीना ताप येणे, काहीना पोटविकाराचा तर काहीना मूत्राशयविकाराचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता जाणवते. महिन्याच्या उत्तरार्धात जीवनसाथीशी वाद, भांडणे होणे संभवते. तसेच जीवनसाथीची आरोग्यविषयक समस्या चिंता निर्माण करील. जपा. पण महिन्याच्या उत्तरार्धात शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. बुधाच्या अनुकुलतेने हाती घेतलेल्या कार्यात यश मिळेल. सुख-समाधान लाभेल. व्यापार-व्यवसाय असणारांना भरभराट होत असल्याचा अनुभव येईल. शुक्रामुळे नोकरीत काहीना मानाचे तर काहीना प्रतिष्ठेचे स्थान मिळणे संभवते. इतरानाही छोटेमोठे लाभ होतील. काही भाग्यवान मंडळीना भूमिलाभ होणेही संभवते. पण या राशीच्या दशम स्थानी असलेल्या मंगळामुळे नोकरी-व्यवसायात मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या युवकांना हातचे सोडून नवीन काही करावेसे वाटेल. पण त्यांनी तसे करू नये. आहे तो वर्तमान नोकरी-व्यवसायच मनापासून करावा. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने या राशीच्या विवाहेच्चूंचे विवाह ठरतील. प्रेमसंबंधअसतील तर ते दृढ होतील. नवे स्नेह्संबंध निर्माण होतील. काहीना दूरच्या प्रवासाचे योग येणेही संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात शुक्र ग्रह या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावर सुख-समाधान देणाऱ्या घटना घडतील. श्रद्धेने श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा "चे दररोज पठण करा.

=====ooo0ooo=====